# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)

## Savitribai Phule Pune University

(Formerly University of Pune)

छाननी व तालिनीकरण कक्ष
गणेशखिंड, पुणे ४११००७
दूरध्वनी क्र. ०२०–२५६२१४२२
website:www.unipune.ac.in

Scrutiny & Tabulation Section
Ganeshkhind, Pune-411007
Phone- 20-25621422
Email: st-sodl@pun.unipune.ac.in

जावक. क्र: परीक्षा/छावता/८९४ दिनांक:— ३०/०६/२०२६

प्रति,

मा.प्राचार्य/केंद्रप्रमुख/समन्वयक,
दूरस्थ आणि ऑनलाईन शिक्षण केंद्राअंतर्गत सर्व संबंधित अभ्यास केंद्रे
प्रस्तुत विद्यापीठ.

**विषय : दूरस्थ आणि ऑनलाईन शिक्षण केंद्राअंतर्गत असलेल्या B.A., B.Com., M.A., M.Com. (CBCS 2019) (Yearly Pattern) आणि M.B.A (Rev.2021) अभ्यासक्रमांचे जून २०२६ परीक्षेचे अनुशेषित (Backlog) विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज मुदतवाढीबाबत.**

**संदर्भ : १.पत्र जावक क्र.परीक्षा/ छावता/ ५८५, दिनांक २२/०४/२०२६.**
**२.दूरस्थ आणि ऑनलाईन शिक्षण केंद्राचा इमेल दिनांक २२/०६/२०२६.**
**३.दूरस्थ आणि ऑनलाईन शिक्षण केंद्राचा इमेल दिनांक ३०/०६/२०२६.**

महोदय / महोदया,

उपरोक्त विषय आणि संदर्भांकीत पत्र व इमेलला अनुसरून आपणांस कळविण्यात येते की, दूरस्थ आणि ऑनलाईन शिक्षण केंद्राअंतर्गत असलेल्या B.A., B.Com., M.A., M.Com. (Yearly Pattern) आणि M.B.A (Rev.2021) या अभ्यासक्रमांच्या अनुशेषित (Backlog) विद्यार्थ्यांचे जून २०२६ परीक्षेसाठीचे अर्ज सुरू करण्याबाबत संदर्भ क्र. १ नुसार सूचित करण्यात आलेले होते. त्यानुसार पुढील विवरणात नमूद परीक्षा अर्ज विलंब शुल्कासह सादर करण्याची अंतिम मुदत संपुष्टात आलेली आहे.

तथापि काही विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज भरण्याचे राहीले असल्याने अशा विद्यार्थ्यांचे परीक्षा अर्ज सादर करण्यासाठी मुदतवाढ देणेबाबत प्रस्तुत विद्यापीठाच्या दूरस्थ आणि ऑनलाईन शिक्षण केंद्राने संदर्भ क्र. २ आणि ३ मध्ये नमूद इमेलव्दारे विनंती केलेली आहे. त्यानुसार ज्या पात्र विद्यार्थ्यांचे वरील परीक्षा अर्ज भरावयाचे राहून गेलेले आहेत अशा विद्यार्थ्यांसाठी पुढील वेळापत्रकानुसार पूर्वीच्याच नियम व अटींनुसार दूरस्थ आणि ऑनलाईन शिक्षण केंद्राच्या www.unipune.ac.in/sol या संकेतस्थळावरून उपरोक्त परीक्षा अर्ज विलंब शुल्कासह भरण्यास मुदतवाढ देण्यात येत आहे.

| Sr.No | Course Name | With Late Fee Start Date | With Late Fee End Date |
|---|---|---|---|
| 1 | B.A., B.Com., M.A., M.Com. (Yearly Pattern) | 01/07/2026 | 02/07/2026 |
| 2 | M.B.A (Rev. 2021) | 06/07/2026 | 09/07/2026 |

याची नोंद घेवून त्यासंदर्भात सर्व पात्र विद्यार्थ्यांना व संबंधितांना आपल्या स्तरावरून अवगत करण्यात यावे व सदरहू परीक्षा अर्ज भरण्यापासून कोणताही पात्र विद्यार्थी वंचित राहणार नाही याची दक्षता घेण्यात यावी.

(डॉ.राजेंद्र तलवारे)
मा.संचालक,
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

**प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी:–**

१. मा.संचालक, दूरस्थ आणि ऑनलाईन शिक्षण केंद्र, प्रस्तुत विद्यापीठ
-सदरबाबत सर्व विद्यार्थी आणि अभ्यासकेंद्रांना त्वरित अवगत करण्यात यावे.

२. विभागप्रमुख, माहिती व व्यवस्थापन कक्ष, प्रस्तुत विद्यापीठ
-वरील मुदतवाढीनुसार आवश्यक ती प्रक्रिया त्वरित करण्यात यावी.